वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि.१० जानेवारी २०२६ पाने ४ किंमत ३

# शिंदे सेना अन् एमआयएम एकाच गटात राहू शकत नाही

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## शिवसेनेसोबत युती ठेवायची असेल तर एमआयएमला बाहेर काढा-जिल्हाप्रमुख मुळूक

**परळी, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्याच्या राजकारणाचे केंद्र असलेल्या परळी नगरपालिकेत गटनेता निवडीवरून महायुतीमधील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात उघड संघर्ष सुरू झाला आहे.**



शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसला स्पष्ट आणि निर्वाणीचा इशारा दिला आहे. मुळूक यांच्या मते, एमआयएम सारख्या जातीवादी पक्षाला सोबत घेताना शिवसेनेला किंचितही कल्पना दिली गेली नाही किंवा विश्वासात घेतले गेले नाही. तुम्हाला शिवसेनेसोबत युती ठेवायची असेल, तर आधी एमआयएमला बाहेर काढा, अन्यथा आम्हाला या गटातून बाहेर पडण्याची रीतसर परवानगी द्या, अशी आक्रमक मागणी मुळूक यांनी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांसमोर जेव्हा सह्यांची प्रक्रिया पार पडली, तेव्हा कोणत्या पक्षाला सोबत घेणार याबाबत स्पष्टता नव्हती, असा दावाही मुळूक यांनी यावेळी केला.

शिवसेनेने आपल्या भूमिकेत हिंदुत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला असून कोणत्याही परिस्थितीत या विचाराशी तडजोड करणार नसल्याचे म्हटले आहे. हिंदुत्वाच्या विचाराला तडा जाऊ देणार नाही, असे सांगत शिंदे गटाने स्पष्ट केले की, महायुतीत एक तर शिवसेना राहील किंवा एमआयएम, हे दोन्ही पक्ष एकाच गटात राहू शकत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत जातीवादी शक्तींसोबत सत्तेत सहभागी होणार नाही, असा ठाम पवित्रा शिंदेंच्या शिवसेनेने घेतल्याने महायुतीसमोर मोठे पेचप्रसंग निर्माण झाले आहेत.मुंडे बंधू-भगिनींच्या

▸▸ पान २ वर

# पुन्हा नादाला लागू नको, तुझाही संतोष देशमुख करू

## मराठवाड्यातील आणखी एका सरपंचाला मारहाण

मुंबई , (दिव्य न्युज):- मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात पवनचक्कीचे कामे सुरु आहेत. त्यामुळे या ठिकाणी पवनचक्कीसाठी विजेचे खांब उभारण्याचे कामे सुरु आहेत. त्यातून शेतकरी व संबंधित कंपनीचे कर्मचारी यांच्यातील वादाचे प्रकार घडत आहेत. पवनचक्कीच्या वादतूनच वर्षभरापूर्वी केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली होती. हे प्रकरण ताजे असतानाच आता धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील शेंडीचे सरपंच तुकाराम वीर यांच्यासह त्यांच्या पुतण्याला १५ ते २० जणांनी जबर मारहाण केली असून 'तुझा ही संतोष देशमुख करणार' अशी धमकी दिली आहे.

हा प्रकार वाशी तालुक्यातील शेंडी येथे गुरुवारी घडला. या मारहाणीत जखमी झालेल्या दोन्ही जखमींना येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याप्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंद झाला नव्हता.वाशी तालुक्यातील दहिफळ शिवारातील गट क्रमांक २२ मध्ये सध्या पवनचक्कीसाठी

▸▸ पान २ वर

# 'तुळजाभवानीचा प्रसाद म्हणून ड्रग्ज पुडी दिली जाईल'

## तानाजी सावंतांना दणका बसणार? पुजारींनी उचलंल मोठं पाऊल

मुंबई , (दिव्य न्युज):- एकनाथ शिंदे शिवसेनेचे माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या अडचणी वाढण्याच्या शक्यता आहे. महाराष्ट्राचं कुलदैवत तुळजाभवनी आहे. तुळजापुरात ड्रग्ज प्रकरणातील आरोपी नगराध्यक्ष म्हणून निवडून दिला, आता मातेचा प्रसादा देण्याऐवजी येणाऱ्या भक्तांना ड्रग्जची एक पुडी दिली जाईल, असे विधान केले.

यावरून तुळजाभवानी मातेच्या मंदिरातील पुजारी आक्रमक झाले असून, यामुळे महाराष्ट्रातील लाखो भाविकांच्या भावना दुखवल्याचे म्हणणे आहे. याप्रकरणी कारवाई व्हावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.एकनाथ शिंदे शिवसेनेचे माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या एका वक्तव्याने नवा वाद निर्माण झाला आहे. तानाजी सावंताविरोधात तुळजापुरातील पुजारी आक्रमक झालेत.



तानाजी सावंत यांच्या विरोधात गुन्हा दाखल करत कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पुजाऱ्यांनी केली.

जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांना निवेदन देत, तानाजी सावंत यांच्याविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

▸▸ पान २ वर

# बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी आल्यापासून खुर्चीवर बसूनच शेळ्या हाकू लागले

## कित्येक महिन्यापासून ना दुरूस्त असलेल्या अग्निशामन वाहन दुरूस्त करून घेता आले नाही?

### मुख्याधिकारी साहेब, जरा जनाची नाही तर मनाची तरी ठेवा! होत नसेल तर बीडमधून आपला बोऱ्याबिस्तरा गुंडाळा

### मुजीबाभाई हारतुऱ्याचा कार्यक्रम जरा बंदच करा या आणीबानी सेवकडे तात्काळ लक्ष द्या, नवीन वाहने येईल जेव्हा येईल आहे तेच वाहने अगोदर दुरूस्त करून घ्या, नवीन वाहने यायला पाच-सहा महिने लागतील तो पर्यंत तीन लाख लोकांना वाऱ्यावर सोडून देणार का?

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्याला कर्तृत्वान पालकमंत्री मिळाले. बीडकरांना अशा झाली की, बीड सुधारेल आणि अधिकारी सुधारेल, प्रशासनाच्या कामात गती येईल, आणीबाणी सेवा मजबुत राहिल, बीडचा विकास भरभरून होईल पण पालकमंत्र्यांच्या गप्पेबाज भाषण काही थांबेना... आणि बीडचा विकास काही दिसेना... अशी काहीशी अवस्था बीडच्या प्रशासनाची झाली असून खास करून बीडच्या नगर पालिके विषयी तर काय बोलावे आणि काही नाही बोलावे हेच कळेना... बीड नगर पालिकेला या पुर्वी निता अंधारे म्हणुन मुख्याधिकारी होत्या. त्यांच्या कार्यकाळात उजेड कमी आणि अंधार जास्त असाच खेळ सुरू राहिला. फक्त आणि फक्त झोळी भरण्याचे काम या तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे व त्यांचे काही ठराविक बागलबच्चांनी केले. जन आंदोलन झाले अनेक तक्रारी झाल्या आणि शासनाने निता अंधारे सारख्या गैरकर्तृत्वान मुख्याधिकाऱ्यांची बदली करून टाकली. त्यांच्या जागेवर शैलेश फडसे नावाचे मुख्याधिकारी आले या मुख्याधिकाऱ्यांनी तर फिविकॉलचा मजबुत जोड या प्रमाणे दिवसभर खुर्चीला चिटकून बसण्याचा खेळ सुरू केला. सकाळी ११ वाजल्यापासून ते संध्याकाळी मनात येईल त्या वेळापर्यंत फडसे साहेब खुर्चीलाच चिटकून बसलेले असतात. ना प्रशासनामध्ये सुधार, ना कामांमध्ये सुधार आहे तेच पहिले पाडे पंचावन्न अशीच काहीशी स्थिती सध्या नगर

▸▸ पान २ वर






नादुरूस्त वाहन




नादुरूस्त वाहन




नादुरूस्त वाहन




अपघाती वाहन

# तपासणी न करताच ३२० वाहनांना दिले फिटनेस प्रमाणपत्र

## परराज्यातील पाच एजंटवर गुन्हा दाखल झाल्यामुळे बीडमधील एजंटामध्ये खळबळ

बीड, (दिव्य न्युज):- योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) नुतनीकरणाच्या कामकाजात परराज्यातील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांमार्फत मोठ्या प्रमाणावर बनावट व बोगस पद्धतीने वाहनांना फिटनेस प्रमाणपत्रे दिली जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सतर्क तपासणीत हा कोट्यवधींचा घोटाळा समोर आला असून याप्रकरणी परराज्यातील पाच एजंटावर बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींची संख्या आणखी वाढणार असून या घटनेने बीड जिल्ह्यातील एजंट, वाहनधारक यांच्यामध्येही खळबळ उडाली आहे.

दैनंदिन वाहन तपासणीदरम्यान असे निदर्शनास आले की, बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंद असलेल्या अनेक वाहनांना केंद्रीय मोटार वाहन कायदा कलम ५६ व केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ चे उल्लंघन करून, कायद्याने विहित केलेली कार्यपद्धती न वापरता, प्रत्यक्ष वाहन तपासणी न करता फिटनेस प्रमाणपत्रांचे नुतनीकरण करण्यात आले आहे.उलट तपासणीतून मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात नोंद असलेल्या एकूण सुमारे ३२० वाहनांना राजस्थान, झारखंड, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात तसेच इतर राज्यांतील खाजगी स्वयंचलित वाहन तपासणी (-ढड) केंद्रांमधून प्रत्यक्ष तपासणी न करताच योग्यता प्रमाणपत्रे जारी करण्यात आली आहेत. ही बनावट पद्धत अद्यापही एजंटमार्फत सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. सदर वाहने प्रत्यक्षात संबंधित -ढड केंद्रावर न नेता, केवळ वाहनांचे फोटो अपलोड करून, मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचा भंग करत फिटनेस प्रमाणपत्रे देण्यात आली. ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाने २८/२०१३ मधील जनहित याचिकेत आदेशित केलेल्या कार्यपद्धतीचेही उल्लंघन आहे.

बोगस फिटनेस प्रमाणपत्र देण्याची एजंटांची पद्धती फिटनेसची मुदत संपलेल्या वाहनांचे चारही बाजूंचे फोटो, ऑडोमीटर व चेसिस क्रमांकाचे फोटो एजंटमार्फत घेतले जातात. प्रत्येक राज्यात नियुक्त एजंट हे संबंधित -ढड केंद्रातील एजंट किंवा मालक व कर्मचाऱ्यांच्या संपर्कात असतात. वाहनमालकांकडून अंदाजे १० ते २० हजार रुपये घेऊन एक ते चार दिवसांत फिटनेस ऑनलाइन अपडेट होईल असे आश्वासन दिले जाते. त्यानंतर हे फोटो रॅकेटमधील पुढील एजंट किंवा थेट -ढड केंद्रातील कर्मचाऱ्यांकडे पाठवले जातात. प्रत्यक्ष वाहन तपासणी न करता शासनाच्या अधिकृत 'वाहन ४.०' प्रणालीवर फिटनेस प्रमाणपत्र अद्ययावत केले जाते.

### दोन महिन्यांचे स्टिंग ऑपरेशन

हा स्कॅम उघडकीस आणण्यासाठी मोटार वाहन निरीक्षक गणेश विघ्ने यांनी मागील दोन महिन्यांपासून अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, बीडचे परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्टिंग ऑपरेशन राबवले. या कारवाईसाठी त्यांना बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील राहुल माने, अतुल गावडे, शशिकांत जाधव, पवन गायके व प्रवीण काकडे यांनी सहकार्य केले.

### पाच एजंटवर गुन्हा दाखल

मोटार वाहन निरीक्षक गणेश विघ्ने यांच्या फिर्यादीवरून साकिब रजा, हाजी फारुक हाजी अब्दुल सत्तार मन्सूरी, कपिल मौर्या, अपु नोवेल व अन्य एक अशा परराज्यातील पाच एजंटवर मोटार वाहन कायद्यानुसार विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा अधिक तपास बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज करत आहेत.




### एनआयसीही सुरक्षित नाही

एनआयसी येथून उपप्रादेशिक परिवहन विभागाला लॉगिन आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन दिले जातात. यासाठी प्रत्येक अधिकार्यास स्वतंत्र युजर आयडी व पासवर्ड दिलेला असतो. मात्र, एनआयसीमधून डेटा लिक होत असल्याचा गंभीर प्रकार समोर येत असून, हे युजर आयडी व पासवर्ड एजंटांच्या हाती लागत आहेत. त्याचा गैरवापर करुन परराज्यात बसून मागील तारखांना अनेक वाहनांना फिटनेस प्रमाणपत्रे दिल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकरणात ज्या अधिकार्याच्या लॉगिनवरून फिटनेस दिला जातो, त्यालाच जबाबदार धरले जाते. मात्र प्रत्यक्षात एजंटांनी चुकीच्या पद्धतीने मिळवलेल्या युजर आयडी व पासवर्डमुळे हा गैरप्रकार घडत असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे एनआयसीची प्रणालीही पुरेशी सुरक्षित नसल्याचे या प्रकारावरून समोर येत आहे.

### गणेश विघ्ने यांचा पुढाकार; दोन महिन्यांचे स्टिंग ऑपरेशन

हा स्कॅम उघडकीस आणण्यासाठी मोटार वाहन निरीक्षक गणेश विघे यांनी मागील दोन महिन्यांपासून अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, बीडचे परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्टिंग ऑपरेशन राबवले. बोगसगिरी करणाऱ्या पाच एजंटांचा शोध घेतला असून त्यांच्या विरोधात ठोस पुरावेही मिळवले असून पोलीसांच्या स्वाधीन केले आहेत. या कारवाईसाठी त्यांना बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील राहुल माने, अतुल गावडे, शशिकांत जाधव, पवन गायके व प्रवीण काकडे यांनी सहकार्य केले.

# ट्रकच्या बॅटरीतून शॉर्ट सर्किट; ४ एकर ऊस जळून खाक

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- तालुक्यातील जवळगाव शिवारात शुक्रवारी (दि.९) दुपारी ऊस तोडणी सुरू असताना एका दहा टायर ट्रकच्या बॅटरीमध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत शेतकरी पार्थ उत्तम सोळंके यांचा काढणीला आलेला चार एकर ऊस आणि संबंधित ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला. यामुळे शेतकऱ्याचे सुमारे सात लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जवळगाव येथील सोळंके यांच्या शेतात उसाची तोडणी सुरू होती. तोडलेला ऊस वाहून नेण्यासाठी आलेल्या ट्रकच्या चालकाने गाडी सुरू करण्यासाठी 'सेल्फ' मारला असता, बॅटरीमध्ये अचानक स्पार्किंग होऊन ठिणग्या उडाल्या. या ठिणग्यांमुळे आगीचा भडका उडाला. आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे ऊस भरण्यासाठी उभा असलेला ट्रक आणि शेतातील उभा ऊस आगीच्या विळख्यात सापडला.या दुर्घटनेत ट्रकचे आणि शेतातील पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. भर दुपारी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. तोडणीला आलेला ऊस डोळ्यादेखत जळून खाक झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले, मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याने मोठे नुकसान टाळता आले नाही. महसूल विभागाकडून या नुकसानीचा तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



पान १ वरून

### धम्मध्वज दिनानिमित्त

केले. आजच्या सामाजिक तणाव, द्वेष व असमानतेच्या पार्श्वभूमीवर भगवान बुद्धांचा धम्म हा शांती, नैतिकता व मानवतावादी जीवनमूल्यांचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. दान, शील व प्रज्ञेच्या आचरणातून व्यक्ती व समाजाचे सकारात्मक परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमातून दानशीलता, समभाव व सामूहिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित उपासक-उपासिकांनी धम्म आचरणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली. संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध व धम्ममय वातावरणात पार पडला. अशा उपक्रमांमुळे समाजात बंधुता, सद्भावना व नैतिक मूल्ये अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### ना.पंकजाताईमुळे

व विद्यार्थिनी पिरेडघेत होते त्यावेळेस पालक शेख रईस यांनी विद्यार्थिनी व विद्यार्थी यांच्यासमोर बोलावून प्राध्यापक नसल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे स्पष्ट दाखविले मराठी माध्यमचे संदीप पाटील सर ते त्यांना गायडन्स करत होते मी तात्काळ दखल घेऊन नामदार पंकजाताई साहेबा पशुसंवर्धन, पर्यावरण मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देऊन नेकनूर उर्दू डीएड कॉलेजचे ताईंना एक ही प्राध्यापक प्राध्यापिका नाही ताईंनी पीए प्रदीप कुलकर्णी साहेब यांना तात्काळकाम करण्याचे आदेश दिले प्रदीप कुलकर्णी साहेब यांनी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांना ८/१२/२०२५ रोजी फोनवरून प्राध्यापक तात्काळ द्यावे असे शिक्षण उपसंचालक साहेब यांनी पाच प्राध्यापक यांचे नियुक्तीचे पत्र दिले २०/१२/२०२५ तब्बल वीस दिवसानंतर शिकविण्याकरिता तात्काळ मिलीया कॉलेज बीड या विद्यालयाचेदोन-तीन प्राध्यापकांची व्यवस्था केली समायोजन बंद असल्यामुळे मिल्या कॉलेजमधून प्राध्यापकांची शिकविण्याकरिता प्राध्यापकांची सोय केली त्याबद्दल पालक व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सय्यद शोहिब आमदार भारतीय जनता पार्टी बीड जिल्हा अल्पसंख्यांक सरचिटणीस परिश्रम मेहनतकरून मेहन प्राध्यापक आणल्या बद्दल डीएड कॉलेज नेकनूर मध्ये९,१,२०२६ रोजी विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक यांनी सय्यद शोहेब आमदार यांचा सत्कार केला व कौतुक केले व त्यावेळेस शेख राईस रेफ्रिजेशनचे प्रोप्रायटर, हाजी सर्फराज उद्दिन साहब, व व नवीन आलेले प्राध्यापक यांचाही सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला सय्यद मासी,, पठाण फहीम, शेख अस्लम व विद्यार्थी विद्यार्थिनी मराठी माध्यमचे प्राध्यापक कार्यक्रमाला उपस्थित होते.

### महात्मा गांधींचे

(सत्याग्रह) व अहिंसा होता. अन्यायाविरुद्ध लढा देताना हिंसा न करता सत्याच्या बळावर प्रतिकार करणे हे त्यांचे तत्त्व होते.सत्याग्रह म्हणजे अन्यायाविरुद्ध नैतिक दबाव टाकण्याची चळवळ असेही सांगितले तसेच असहकार, सविनय कायदेभंग, उपोषण ही त्याची साधने होती.त्यांना ग्रामस्वराज्य मान्य होते. सत्ता केंद्रित न होता गावपातळीवर असावी, असे त्यांचे मत होते.गांधीजी लोकशाहीचे समर्थक होते पण लोकशाही ही नैतिक मूल्यांवर आधारित असावी. महात्मा गांधींचे राजकीय विचार आजही लोकशाही, शांतता आणि सामाजिक न्यायासाठी मार्गदर्शक ठरतात.अध्यक्षीय भाषणात प्रोफेसर अब्दुल अनिस यांनी महात्मा गांधीचे विचार आज समाजात कसे अत्यंत आवश्यकता असून त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे असे सांगितले.राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.खय्युम फारोखी यांनी सूत्रसंचालन केले तर आभार डॉ. शेख गफूर अहमद यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यार्थी- विद्यार्थिनी, व्याख्यानमालेच्या संयोजिका डॉ.सय्यद तनवीर, डॉ.शेख हुसेन इमाम, प्रा.शेख गफूर अहमद, प्राध्यापकवृंद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलयास फाजील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### दुचाकी-कार अपघातात

प्रसादराव कदम(वय ४५) दोघे रा. बोर्डी ता. जिंतूर आणि दत्ता माणिकराव कऱ्हाळे(वय ३०) रा. मुडा ता. जिंतूर अशी मयत किर्तनकारांची नांवे आहेत. परभणी तालुक्यातील पिंपळा येथे किर्तनसेवा आटोपून शनिवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास दुचाकी क्रं - एमएच - २२ एएक्स ९५७६ द्वारे गावाकडे परतत असताना जिंतूर - परभणी राष्ट्रीय महामार्गावर झरी परिसरातील निम्न दुधना कालवा परिसरात परभणीच्या दिशेने येत असलेली कार क्रं - एमएच २९ बीव्ही ७७९० ची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात कार आणी दुचाकीचा चुराडा झाला. अपघात एवढा जोराचा होता की दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला फेकली गेली. घटनेची माहिती मिळताच अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ, उपविभागीय अधिकारी चंद्रसेन देशमुख, ग्रामीण पोलिसांचे सहायक पोलिस निरीक्षक जीवन राजगुरू आदींनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ परभणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून तिघाही किर्तनकारांना मयत घोषित केले. या प्रकरणी परभणी ग्रामीण पोलिसांत घटनेची नोंद करण्यात आली असून पोलिस अधिक तपास करीत आहेत. अपघाताच्या या भीषण घटनेमुळे बोर्डी आणि मुडा या गावांवर शोककळा पसरली आहे.

पान १ वरून

### शिंदे सेना अन

नेतृत्वात लढवली निवडणूक

विशेष म्हणजे, परळी नगरपालिकेची ही निवडणूक मंत्री पंकजा मुंडे आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या संयुक्त नेतृत्वात लढली गेली होती. या निवडणुकीत महायुतीने शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा मोठा पराभव करत निर्विवाद वर्चस्व राखले होते. ३५ पैकी दोन जागा मतदानापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या, तर उर्वरित जागांवरही महायुतीने विजयाची मोहोर उमटवली होती. मात्र, आता सत्तेच्या वाटणीत आणि गटनेता निवडीत एमआयएमचा प्रवेश झाल्याने मुंडे बंधू-भगिनींच्या नेतृत्वाखालील या मोठ्या विजयाला आता अंतर्गत वादाचे ग्रहण लागल्याचे चित्र दिसत आहे.सध्या परळी नगरपालिकेतील पक्षीय बलाबल पाहिले तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे १६, भाजपचे ७ आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे २ सदस्य आहेत. याशिवाय शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे २, काँग्रेसचा १, एमआयएमचा १ आणि ६ अपक्ष सदस्यांचे संख्याबळ आहे. सर्वाधिक १६ सदस्य असूनही राष्ट्रवादीने एमआयएमच्या एका सदस्याला सोबत घेण्याचा निर्णय घेतल्याने केवळ २ सदस्यांच्या शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेत युती तोडण्याची भाषा सुरू केली आहे. या राजकीय पेचप्रसंगामुळे आता वरिष्ठ पातळीवरून काय तोडगा काढला जातो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### पुन्हा नादाला

विजेचे खांब उभारणीचे काम सुरु आहे. सेरेटिंका कंपनीने हे काम दुसऱ्या एका कंपनीला दिले आहे. या खांबावरील विजेची वाहिनी रुतुध्वज वीर यांच्या शेतातून गेली आहे. सरपंच वीर यांनी संबंधित कंपनीच्या वीज वाहिनीच्या कामाचे पैसे गेल्या चार महिन्यांपासून मागत होते; मात्र संबंधिताकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत होती.

गुरुवारी सकाळी तांदूळवाडी (ता. वाशी) येथे पंधरा ते वीस जणांनी सरपंच वीर यांच्या शेंडी येथील घराबाहेर बोलावण्यात आले. यावेळी ते घराबाहेर आले असता त्यांच्यासह पुतणे रुतुध्वज यांना लाठ्या काठ्या तसेच दगडांनी जबर मारहाण करण्यात आली. या मारहाणीत सरपंच वीर यांना मुका मार लागला, तर रुतुध्वज यांच्या छातीवर जबर मार लागला. दोघांनाही येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक उपचारानंतर दोघांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.गेल्या चार महिन्यापासून माझा पुतण्या रुतुध्वज याच्या शेतातून गेलेल्या पोलच्या विद्युत वाहिनीच्या पैशाची मागणी करीत होतो; मात्र आम्हाला सतत उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. त्यानंतर माझ्या घरी आलेले अमर भराटे व त्याच्यासोबत असलेल्या पंधरा ते वीस जणांनी मला व माझ्या पुतण्याला लाठ्या-काठ्याने जबर मारहाण करीत 'तुझाही संतोष देशमुख करणार अशी धमकी दिली, अशी प्रतिक्रिया शेंडीचे सरपंच तुकाराम वीर यांनी दिली आहे.

### 'तुळजाभवानीचा

चार दिवसांपूर्वी जिल्हापरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने घेतलेल्या मेळाव्यात तानाजी सावंत यांनी तुळजापूरात ड्रग्ज प्रकरणातील आरोपी नगराध्यक्ष म्हणून निवडून दिला, आता मातेच्या प्रसादा देण्याऐवजी येणाऱ्या भक्तांना ड्रग्जची एक पुडी दिली जाईल, असं विधान केलं.

तानाजी सावंत यांच्या याविधानावरून पुजारी आक्रमक झालेत. तसेच जाहीर सभेत तानाजी सावंतांनी तुळजाभवानी देवीच्या गाभाऱ्याच्या पवित्रतेवरही संशय निर्माण केला म्हणत, पुजाऱ्यांनी तानाजी सावंतांविरोधात गुन्हा दाखल करत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच तानाजी सावंत यांनी चूक मान्य करत जाहीर माफी मागावी, अशीही मागणी करण्यात आली.तुळजापूरमधील ड्रग्ज प्रकरण राज्यभर गाजले. याच प्रकरणात विनोद गंगणे यांना अटक झाली होती. ते जामिनावर सुटला. भाजपाने त्यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली. विनोद गंगणे नगराध्यक्ष म्हणून जिंकून आले. त्यांच्या विजयानंतर आता शिंदेसेनेचे नेते तानाजी सावंत यांनी भाजपा आणि आमदार राणाजगजित सिंह यांच्यावर हल्ला चढवला. ते आता प्रसाद म्हणून ड्रग्जची पुडीही देतील असे सावंत म्हणाले.

### बीड नगर पालिकेचे

पालिकेची आहे. वसूली विभागाचा कोणी वाली नाही? जन्म आणि मृत्यू विभागाने तर लुटारूंचा धंदाच सुरू केला, नगररचना विभागा राम भरोसेच... दोन्ही तळे तुडुंब भरले असतानाही बीडकरांना १२ दिवस पाण्या पाण्यासाठी तरसावे लागते. विद्युत विभागात मध्ये तर सगळा अंधारच आहे. हे तर सोडून द्या पण आणीबाणी सेवाही या फडसेंच्या कार्यकाळात कोलमडलेली आहे. बीड शहराची लोकसंख्या ३ लाखांच्या आसपास असून बीड शहराला लागून अनेक लहान-मोठे गावे, तांडे, वाडी,वस्ती आहेत. मात्र फडसेंना हे कसे कळले नाही की आणीबाणी सेवा देणारी बीड नगर पालिकेची अग्निशामन विभाग ना दुरूस्त आहे. या विभागाकडे तीन वाहने असून एक वाहन विना वापरा आहे तर दोन वाहने हे नादुरूस्त आहेत. काही महिन्यापुर्वी राज्य शासनाकडून बीडच्या नगर पालिकेला एक मिनी अग्निशामन वाहन मिळाले होते. त्याच्यावरच संपूर्ण बीडचा आणीबाणींचा कारभार हाकला जात आहे. पण बीडचे पालकमंत्री दौऱ्यावर आले त्यांच्या ताफ्यात हे एकमेव वाहन देण्यात आले त्या ही वाहनाचा अपघात झाला आणि संपूर्ण वाहन चेंदामेंदा झाले. याची काहीच काळजी मुख्याधिकारी शैलेश फडसेंना नाही. एवढ्या बेजबाबदारी अधिकाऱ्यांवर खरंतर शासनाने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. जे दोन वाहने नादुरूस्त आहेत त्यावर दोन पाच लाखांच्या आसपास खर्च असेल एवढाही खर्च करण्याची ऐपत या नगर पालिकेची नाही का? की खाऊ उत्तीमुळे या आणीबाणी सेवेकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात आले. काल -परवा बीडमध्ये एका स्क्रॅपच्या दुकानामध्ये आग लागली ती आग विझविण्यासाठी त्या परिसरातील नागरीकांनी अक्षरशः बोअरवेल सुरू केले आणि खाजगी ट्रॅक्टर मागवून आग विझविण्याचे अतोनात प्रयत्न केले. बीड शहरात अनेक मोठे मोठे मॉल आहेत. मोठ मोठे शॉपींग कॉम्प्लेक्स आहेत, थेअटर आहेत, मोठे मोठे अपार्टमेंट आहे, मोठे मोठे रूग्णालय आहेत, मोठ मोठे कार्यालय आहेत, या ठिकाणी एखाद्या वेळी मोठी आग लागली तर ती विझविण्यासाठी काय करावे लागेल? याचे उत्तर आता कोणाला विचारायचे? नुक्तीच निवडणूक झाली बीडकरांनी त्या पालकमंत्र्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवत त्यांच्या पक्षाचे उमेदवार प्रेमलताताई पारवे यांना नगराध्यक्ष करून बीडची नगर पालिका अजितदादांच्या ताब्यात दिली. त्या नगर पालिकेची अवस्था अशी आहे. प्रेमलताताई पारवे यांचे प्रतिनिधी असलेले संपादक शेख मुजीब यांच्यावर ही बीडकरांनी विश्वास दाखविला.त्यांचाच चेहरा पाहुन बीडकरांनी भरभरून मतदान करत नगर परिषदेचा कारभार त्यांच्या सासूंच्या हाती दिला. आता मुजीबभाई हार तुऱ्याचा कार्यक्रम बंदकरा आणि या खुर्चीला चिटकून बसलेल्या फडसेंचे कान टोचा.... आणीबाणी सेवेकडे दुर्लक्ष करणारे या बेजबाबदार मुख्याधिकारींना वटणीवर आणा... काम करण्याची इच्छा नसेल तर तात्काळ आपला बोरिआबिस्तर गुंडाळा आणि नादेडच्या दिशेने कुच करा. तिथून पुढे अशी काही मोठी घटना घडलीच आणि अशीच स्थिती राहिली तर शैलेश फडसेला तर सोडा बीडकर मुजीबभाई तुम्हाला जबाबदारी धरतील. नवीन वाहने खरेदी होईल जेव्हा होईल तो पर्यंत तात्काळ येणाऱ्या दोन चार दिवसात बीड नगर पालिकेतील या अग्निशामन विभागातील सर्व वाहने व तसेच स्वच्छता विभागातील सर्व वाहने तात्काळ दुरूस्त करा.